## जाणीव :-

जीवन सरता सरता, आज मला हे आकळले
रोजची जरी गाठभेट, कुणी कुणाला न जाणिले.

कुणी असे व्यग्र स्वदुःखात, प्राप्त सुखाची नाही किंमत
दुसरा मात्र नशिबवान, हे म्हणायची यांची हिंमत.

कुणी म्हणती मीच शहाणा, सर्व गोष्टींचे मजला ज्ञान
होयबा होयबा करून मला, राखा तुम्ही माझा मान.

आज करती तुमची स्तुती, पाठ फिरता मात्र नालस्ती
हेवा, दावा, मत्सर अन् असूया, यांचीच असे ही परिणती.

मी पण यातील एक असे, भान याचे मला आले
षड्रिपूंच्या मुक्तीसाठी, काय करावे - मन बोले.

कर्ता, करविता तो जगन्नियंता, सृष्टी निर्मून निवांत बैसलासे
अहंकाराचा नाही लवलेश, पाखर मायेची हरी घालतसे.

या हरीचे स्मरण करावे, मानावे त्याचे आभार
अर्पावे सर्व त्याच्या चरणी, उतरून टाकू 'मी'चा भार.

माझ्या मनी ज्या भावना-वेदना, त्याच असती इतरांच्याही
हे जाणण्या, मनी रुजाया, विशाल बनवावे हृदया.

तू चूक अन् मी बरोबर, नको वृथा हा वादंग
शिकवण घेऊ निसर्गाची, अन् जीवन बनवू सहज निसुंदर.




भारती कुलकर्णी.
बिबवेवाडी, पुणे.
९८५०८ ११५९१.